## :: संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३३७/२०१९ मधील निशाणी क्र. ०८ वरील आदेश ::

अर्ज निशाणी क्र.०८ वाचला. अर्जदार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांनी संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३३७/२०१९ मधील जप्त मुद्देमाल नाश करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभाग, महाड यांच्या ताब्यात देण्यास मंजूरी मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. अर्जात असे कथन केले आहे की प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल १) इम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मि.ली.च्या विदेशी दारूच्या ०२ बाटल्या, २) १८० मि.ली.च्या देशी दारूच्या १० बाटल्या, ३) देशी दारूच्या प्रत्येकी रक्कम रूपये २६/- किंमतीच्या १८ सिलबंद बाटल्या असा एकूण रक्कम रूपये १,३००/- किंमतीचा मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा आहे. सदरच्या मुद्देमालापैकी काही दारू रासायनिक परिक्षणाकरिता पाठविण्यात आली व उर्वरित मुद्देमाल हा मुद्देमाल रूममध्ये राखून ठेवल्यामुळे सदर मुद्देमालापैकी काही बाटल्या फुटल्या त्यामुळे मुद्देमाल रूममध्ये दुर्गंधी पसरलेली, त्यामुळे इतर खटल्यातील जप्त मुद्देमाल नाश होण्याची शक्यता आहे. तरी सदरचा उर्वरित वर नमूद मुद्देमालाचा नाश करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क महाड यांच्या ताब्यात देण्याची मंजूरी मिळावी अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर आरोपीचे म्हणणे मागविण्यात आले होते, परंतु आरोपीस अर्जाची नोटीस मिळून देखील त्याने त्याचे म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अर्जदार सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीने प्रस्तुत अर्जावर लेखी म्हणणे दाखल करून कोणतीही हरकत नोंदविलेली नाही, त्यामुळे आरोपीने जप्त मुद्देमालावर कोणतीही मालकी सांगितलेली नाही, तसेच प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमालातील काही दारूच्या बाटल्या फुटल्यामुळे पोलीस ठाण्यामध्ये दुर्गंधी पसरलेली आहे, तसेच

इतर खटल्यातील जप्त मुद्देमाल नाश होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे मला उचित व न्यायाचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र.०८ मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल १) इम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मि.ली.च्या विदेशी दारूच्या ०२ बाटल्या, २) १८० मि.ली.च्या देशी दारूच्या १० बाटल्या, ३) देशी दारूच्या प्रत्येकी रक्कम रूपये २६/- किंमतीच्या १८ सिलबंद बाटल्या असा एकूण रक्कम रूपये १,३००/- किंमतीचा मुद्देमाल नाश करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभाग, महाड यांच्या ताब्यात देण्याची मंजूरी देण्यात येते. जप्त मुद्देमाल नाश करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभाग, महाड यांच्या ताब्यात देण्यासंबंधी सविस्तर पंचनामा तयार करून सदरचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क विभाग, महाड यांच्या ताब्यात दयावा.

३. पोलीस निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क महाड यांनी जप्त मुद्देमाल नियमाप्रमाणे नाश करावा व नाश केल्याबाबतचा सविस्तर पंचनामा खटल्यामध्ये दाखल करावा.

महाड
दिनांक : २७/०४/२०२१

(वि. रा. डोईफोडे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग महाड.